**विशेष परिपत्रक क्र. ६**

**नगरपरिषद खर्चात काटकसर व नगरपरिषद अधिकारी/ कर्मचारी वयाच्या ५०/५५ वर्षाच्या पलिकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर नगरपरिषद अधिकारी/ कर्मचारी यांची लोकहितास्तव सेवा पुर्नविलोकन करणें.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय.**
**परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१०-२०००/प्र.क्र. ८८/००/८**
**गृहनिर्माण भवन (म्हाडा) तळमजला,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**
**दिनांक : १९ ऑक्टोबर २०००.**

परिपत्रक

राज्यातील नगरपरिषदांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेतला असता, नगरपरिषदांची आर्थिक स्थिती सुदृढ नसुन मत्तापेक्षा दायित्व वाढत चालल्याचे निदर्शनास येत आहे. नगरपरिषदांच्या कामकाजामध्ये आर्थिक शिस्तीचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे नगरपरिषदांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. नगरपरिषदांच्या खर्चातील फार मोठा हिस्सा हा आस्थापनेवर खर्च होत असुन त्यामुळे नागरीकांना किमान सुविधा पुरविणे देखील नगरपरिषदांना दिवसेंदिवस कठीण होत आहे.

०२. वरील वस्तुस्थिती विचारात घेता नगरपरिषदांनी त्यांचे खर्चात काटकसरीचे धोरण स्वीकारणे अत्यंत गरजेचे असुन शासनाने योजनेत्तर खर्चात ज्याप्रमाणे काटकसरीचे धोरण स्वीकारलेले आहे त्या प्रमाणे नगरपरिषदांनी आपल्या खर्चात काटकसरीचे धोरण स्वीकारणे गरजेचे आहे व त्यादृष्टीने नगरपरिषदांनी पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) खर्चाच्या प्रत्येक बाबीचा आढावा घेंवून अनावश्यक खर्चात कपात करणे.

२) आस्थापनेवरील खर्च कमी करणे.

(अ) अनावश्यक रिक्त पदांचा आढावा घेऊन ती न भरणे बाबत धोरण स्विकारणे.

(ब) जकात विभागातील कर्मचा-यांना अन्य-विभागातील रिक्त पदांवर सामावून घेणे.

(क) नगरपरिषद अधिकारी/कर्मचारी यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षा पलिकडे किंवा अर्हतकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांची नगरपरिषदेतील सेवा पुढे चालू ठेवण्यासाठी पात्रता आजमाविण्यासाठी त्यांचे गोपनीय अहवाल/सचोटी व शारीरिक क्षमता या विहीत केलेल्या निकषाच्या आधारे त्यांच्या प्रकरणाचे पुनर्विलाकन करुन सुयोग्य व कार्यक्षम अधिकारी /कर्मचारी यांनाच लोकहितास्तव सेवेत चालू ठेवावे व अकार्यक्षम तसेच संशयास्पद सचोटी असणारे अधिकारी/कर्मचारी यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करावे. (महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे नियम १० नुसार)

३) शुभेच्छा, जाहीरात न देणे.

४) समारंभावरील खर्च टाळणे.

५) वीज पुरवठा, पाणी पुरवठा इत्यादी सेवांमध्ये योग्य ते नियोजन करुन खर्च मर्यादेत ठेवण्याचे उपाय अंमलात आणणे.

६) इमारतींमधील वीज बीले, टेलिफोन बील व वाहनांचे इंधन यांच्यावर नियंत्रण ठेवून त्यात काटकसर करणे.

वरील प्रमाणे उपाय योजून चालू वर्षी खर्च किती प्रमाणात कमी करण्यात येत आहे याबद्दल मुख्याधिकारी यांनी एक विशेष अहवाल संचालनालयास सादर करावा.

(भगवान सहाय)
संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय.

प्रति,

१) मुख्याधिकारी, नगरपरिषद (सर्व), २) जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगरे जिल्हा वगळून)

३) विभागीय आयुक्त व प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन (सर्व)